आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

९ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज महाराष्ट्रातल्या ७ हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची दूरदृश्यप्रणालीद्वारे पायाभरणी आणि नवीन दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्घाटन

- भारतीय रिझर्व बँकेच्या पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर, सलग दहाव्यांदा व्याजदरात कोणतेही बदल न करण्याचा निर्णय

- आशियाई टेबल टेनिस विजेतेपद स्पर्धेच्या महिला सांघिक प्रकारात आज भारताचा सामना जपानबरोबर होणार

**आणि**

- महिलांच्या टी२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना श्रीलंकेच्या संघासोबत होणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राज्यातल्या सात हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची दूरदृश्यप्रणालीद्वारे पायाभरणी झाली. यामध्ये नागपूर आणि शिर्डी विमानतळ इथल्या कामांचं भूमीपूजन आणि राज्यातल्या नवीन दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्घाटन करण्यात आलं. मुंबई, अंबरनाथ, नाशिक, जालना, बुलढाणा, हिंगोली, वाशिम, अमरावती, भंडारा आणि गडचिरोली या ठिकाणी ही वैद्यकीय महाविद्यालयं सुरु होणार आहेत. या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या जागा ९०० ने वाढणार असून, एकूण ३५ महाविद्यालयात प्रतिवर्ष चार हजार ८५० एमबीबीएस जागा उपलब्ध होणार

आहेत. भारतीय कौशल्य संस्था आणि महाराष्ट्रात विद्या समीक्षा केंद्राचे उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं.

**महाराष्ट्रात** दहा वैद्यकीय महाविद्यालयांची सुरुवात होणं ही गौरवाची गोष्ट असून याद्वारे आपण विकसित भारताकडे वाटचाल करत आहोत, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. या महाविद्यालयांमुळे मोठ्या प्रमाणात डॉक्टर तयार होणार असून वैद्यकीय सुविधा लोकांपर्यंत सुलभतेने पोहोचवता येणार आहे असंही ते म्हणाले. नागपूर इथं विमानतळ होणार असल्याने इथं गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होईल, आणि महाराष्ट्र प्रगतीपथावर जाईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून लाओसमधल्या व्हिएन्टिनच्या दोन दिवसीय दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटीदरम्यान मोदी एकविसाव्या आसियान-भारत शिखर परिषदेला आणि एकोणिसाव्या पूर्व आशिया शिखर परिषदेला उपस्थित राहतील. या शिखर परिषदेच्या दरम्यान प्रधानमंत्री काही द्विपक्षीय बैठका घेण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

देशभरात पारंपरिक औषधांची उपलब्धता वाढवण्यासाठी आयुर्वेद औषध निर्मिती उद्योगात तरुणांनी सहभाग घेणं गरजेचं असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या ८व्या वर्धापन दिनानिमित्त त्या नवी दिल्ली इथं बोलत होत्या. आयुर्वैदिक महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला. देशात चांगल्या आयुर्वैदिक डॉक्टरांची गरज असल्याचंही राष्ट्रपती मुर्मू यावेळी म्हणाल्या.

**<><><><>**

भारतीय रिझर्व बँकेच्या पतधोरणाचा द्वैमासिक आढावा आज जाहीर झाला. व्याजदरात कोणतेही बदल न करण्याचा निर्णय बँकेनं सलग १०व्या आढाव्यात घेतला आहे. त्यामुळे रेपो दर साडेसहा टक्क्यांवर, स्टँडींग डिपॉझिट फॅसिलिटी दर सव्वा सहा टक्क्यांवर आणि मार्जिनल डिपॉझिट फॅसिलिटी दर पावणे सात टक्क्यांवर कायम आहे. रिझर्व बँकेच्या पतधोरण विषयक समितीची बैठक गेल्या सोमवारपासून मुंबईत झाली. त्या नंतर हा आढावा जाहीर करण्यात आला आहे. यावेळच्या चलनविषयक धोरणात चलनफुगवट्याबाबत दीर्घ काळासाठी जैसे थे भूमिका स्वीकारण्याचा निर्णयही पतधोरण समितीने घेतला. किरकोळ चलनफुगवट्याचा दर चार टक्के पर्यंत रोखण्याच्या दृष्टीनं आणि विकासाला पाठबळ देण्याच्या दृष्टीनं हा निर्णय घेतल्याचं समितीने म्हटलं आहे. चालू आर्थिक वर्षातल्या पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढ ६ पूर्णांक सात टक्के राहिला, मात्र पूर्ण वर्षासाठी जीडीपी दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा अंदाज आढाव्यात व्यक्त करण्यात आला आहे. रिझर्व बँकेच्या पतधोरण समितीची पुढची बैठक येत्या ४ ते ६ डिसेंबर दरम्यान होणार आहे.

<><><><><>

अर्थशास्त्र आणि वाणिज्य या विषयांशी संबधित अध्यापक तसंच विद्यार्थ्यांमध्ये रिझर्व बँकेच्या कारभाराबाबत जागरुकता वाढावी या उद्देशाने रिझर्व बँकेने एक शिष्यवृती योजना जाहीर केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग अथवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण संस्था यांच्या मान्यताप्राप्त महाविद्यालयांमधले पूर्णवेळ अध्यापक या शिष्यवृत्तीला पात्र असतील. अर्थशास्त्र, बँकींग, क्षेत्रीय उलाढाली किंवा बँकेशी संबधित क्षेत्रात कमी कालावधीचा संशोधनासाठी त्यांना अर्ज करता येतील. सादर झालेले संशोधन प्रस्ताव, शैक्षणिक कार्य आणि मुलाखत यावर आधारित पाच शिष्यवृत्या बँक देणार आहे. पुढील महिन्याच्या पाच तारखेपर्यंत

यासाठी अर्ज करता येतील. यासंबधीची सविस्तर माहिती रिझर्व बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

<><><><><>

काँग्रेस नेता राहूल गांधीं यांचं नागरिकत्व रद्द करण्यासंदर्भातल्या याचिकेच्या सुनावणीसाठी दिल्ली उच्च न्यायालयाने ६ नोव्हेंबर ही तारीख दिली आहे. याच संदर्भात अलाहबाद उच्च न्यायालयातही सुनावणी सुरु आहे. या सुनावणीचा अहवाल न्यायालयानं मागवला आहे. राहूल गांधी हे ब्रिटनमध्ये २००३ मध्ये नोंदणी झालेल्या एका कंपनीच्या निर्देशकांपैकी एक होते. या कंपनीने २००५ ते २००६ मध्ये वार्षिक आयकर प्रपत्रामध्ये राहूल गांधींचा उल्लेख ब्रिटीश नागरीक म्हणून केल्याचं या याचिकेत नमूद केलं आहे.

<><><><><>

आशियाई टेबल टेनिस विजेतेपद स्पर्धेच्या महिला सांघिक प्रकारात आज भारताचा सामना जपानबरोबर होणार आहे. कझाकस्तानात सुरु असलेल्या या स्पर्धेत भारतीय संघाने काल उपान्त्यपूर्व फेरीत दक्षिण कोरियाचा ३विरुद्ध २ अशा गुणफरकाने पराभव केला. पुरुष गटाच्या उपान्त्यपूर्व फेरीत आज भारताची लढत कझाकस्तानशी होईल.

<><><><><>

आर्क्टिक खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताच्या लक्ष्य सेनचा सामना डेन्मार्कच्या रासमस गेमके याच्याशी होईल. तर किरण जॉर्ज आज पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत चिनी तैपेईच्या वांग त्झू वेईशी लढत देईल. महिला एकेरीत भारताच्या पी. व्ही. सिंधू पहिल्याच फेरीत कॅनडाच्या मिशेल लीक कडून पराभूत झाली. दरम्यान, भारताच्या आकर्षी कश्यप आणि मालविका बनसोड यांनी सोळाव्या फेरीत प्रवेश केला आहे.

<><><><><>

महिलांच्या टी२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना श्रीलंकेच्या संघासोबत होणार आहे. भारतानं पाकिस्तानविरुद्धचा सामना जिंकून २ गुण मिळवले आहेत तर श्रीलंका पहिले दोन्ही सामने हरल्यामुळे त्यांचं गुणांचं खातं अजून उघडायचं आहे. या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना दक्षिण अफ्रिका आणि स्कॉटलंडच्या संघांदरम्यान खेळला जाईल. अ गटातल्या सामन्यात काल ऑस्ट्रेलियानं न्यूझीलंडवर ६० धावांनी विजय मिळवला. ऑस्ट्रेलिया या गटात ४ गुणांसह आघाडीवर आहे.

<><><><><>

भारत आणि बांग्लादेश यांच्या पुरुष संघांमध्ये आज नवी दिल्लीत टी २० स्पर्धेतला दुसरा सामना खेळला जाणार आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात खेळणाऱ्या भारतीय संघानं तीन सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना जिंकून १-० ने आघाडी घेतली आहे.

<><><><><>

रिझर्व बँकेने व्याज दर कायम ठेवल्याचा परिणाम शेअर बाजारावर दिसून आला. सकाळी नफेखोरीमुळे बाजाराची वाटचाल मंद होती. पण हा निर्णय जाहीर होताच तासाभरात खरेदीचा ओघ वाढल्याने मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ३६९ अंकानी वाढून ८२ हजार ००४ पर्यंत पोचला. तसंच राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १३३ अंकांनी वाढून २५ हजार १४७ अंकावर पोचला.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये अनंतनाग इथे दहशतवाद्यांनी काल सैन्याच्या दोन जवानांचं अपहरण केलं. त्यातल्या एका जवानाचा शोध लागला असून दुसऱ्या जवानासाठी सुरक्षा दलांनी शोधमोहीम राबवली आहे.

<><><><><>

बँकांनी नफा मिळवण्याच्या हेतूने कर्ज देण्यापूर्वी जोखीम कमी करण्यावर भर द्यावा आणि सावधपणे कर्जवाटप करावं, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन काल मुंबई इथे एका कार्यक्रमादरम्यान म्हणाल्या. बँक व्यवस्थेचा एकूण अर्थव्यवस्थेवर आणि कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्यावर थेट परिणाम होत असतो. त्यामुळे कर्ज देण्याच्या प्रक्रियेत सेवेच्या गुणवत्तेवर परिणाम होणार नाही, याची दक्षता बँकांनी बाळगावी अशा सूचनाही सीतारामन यांनी यावेळी केल्या.

**//<><><><>//**